
ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Refereed Research Journal**

Volume : I Special Issue April - 2017



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
**Sarkate Sadashiv Haribhau**
Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | काया मातीत मातीत मधील कवितांचे स्वरूप | प्रा. डॉ. रविकांत शिंदे | ९८ |
| २७ | भारतीय समाज आणि स्त्री प्रश्न | प्रा. डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे | १०२ |
| २८ | सदानंद देशमुख यांच्या कादंबरीतील पुरुषांचे चित्रण | प्रा. डॉ. गायकवाड श्रावन | १०७ |
| २९ | मराठी कवितेतील जागतिकीकरण | प्रा. डॉ. शंकर वाघमारे | ११० |
| ३० | खेळाचे मानसशास्त्र | प्राचार्य डॉ. विश्वास कदम | ११४ |
| ३१ | मौद्रिक धोरण आणि भाववाढ नियंत्रण | डॉ. डास डी.के. | ११७ |
| ३२ | सेवाकर ते जीएसटी करप्रणालीतील बदलाचा भारतीय अर्थव्यवस्थेतील परिणाम | प्रा. डॉ. प्रशांत एन. देशमुख | १२१ |
| ३३ | वस्तु व सेवा कर आढावा | प्रा. डॉ. भगवान सांगळे | १२७ |
| ३४ | प्रा.मे.पु.रेगे यांचे तात्विक चिंतन | डॉ. संजय ह. पाटील | १३१ |
| ३५ | राजर्षी शाहू महाराजांचे प्रशासन | डॉ. सटाले सिध्देश्वर नामदेव | १३८ |
| ३६ | महात्मा गांधी यांचे अहिंसासंबंधी विचार | श्री. समाधान विठ्ठल लांडे | १४१ |
| ३७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास | श्री. बिरंगळ भरत गोरखनाथ | १४४ |
| ३८ | स्वतंत्र विदर्भाबाबत राजकीय पक्षांच्या भूमिका | माधव घोले | १४८ |
| ३९ | माडीया गोंड आदिवासींचे लोक-नृत्यगीत आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोन | प्रा. डॉ. सुरेश वि. धनावडे | १५१ |
| ४० | महाराष्ट्रातील विज निर्मितीचे स्त्रोत, प्रगती, वापर, समस्या: आर्थिक अध्ययन : २००७-०८ ते २०१२-१३ | DR. S. G. Vaidya | १५६ |
| ४१ | The Study of Institutional Finance in Maharashtra | Prof. V.S. Kshirsagar | १६२ |
| ४२ | Water Quality Assessment for Physico-Chemical Analysis in Ahmednagar City | Dr. Mrs. S. R. Deshmukh | १६५ |
| ४३ | महाराष्ट्रातील आदिवासी लोककला | प्रा. डॉ. एम. बी. धोंडगे | १६८ |
| ४४ | डाळींब बागेचे व्यवस्थापन | प्रा. श्रीमती टेकवडे मंगल शांतिनाथ, कॅप्टन डॉ एम.जी.राजपंग | १७० |
| ४५ | रम्यता का पालन करने के लिए समर्पित शरीर गांधारी | डॉ. पुष्पा गोविंदराव गायकवाड. | १७६ |
| ४६ | मराठी भाषा अभ्यासातून मिळणाऱ्या नव्या संधी | डॉ. जयदेवी पवार | १८० |
| ४७ | बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे समाजशास्त्रीय अध्ययन - विशेष संदर्भाने गेवराई तालुका | प्रा. डॉ. तंबलवाड दत्ता माधवराव | १८३ |
| ४८ | मराठी साहित्य आणि मराठी चित्रपट - संबंध | प्रा. रमेश बा. रिंगणे | १८८ |
| ४९ | लोकसंख्या नियंत्रणात कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा चिकित्सक अभ्यास | डॉ. भगवान डोंगरे | १९० |
| ५० | केंद्रिय अंदाजपत्रकातील महिलांसाठी तरतुदी | प्रा. महाजन संजय बाबूराव | १९४ |
| ५१ | Child Malnutrition: A Horrible Problem in India | Mr. Manal Bhagwan Suresh | २०४ |
| ५२ | भारत में जनसंख्या नियंत्रण का प्रयास | प्रा. विद्या जगन्नाथराव भिल्लारे | २०९ |
| ५३ | व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसं' मधील शोषितता | प्रा. डॉ. बाळासाहेब एस. चव्हाण | २११ |
| ५४ | शेतकऱ्यांच्या समस्या निर्मुलनात शासनाची भूमिका | डॉ. शंकर लेखन | २१५ |
| ५५ | Antibacterial activities of marine polychaetes Lumbrinaris heteropoda | Vaidya V. V. | २१९ |
| ५६ | Parent - Child Relationships in the novles of Toni Morrison | Aniket Bhuyar | २२४ |


Scanned with CamScanner

# राजर्षी शाहू महाराजांचे प्रशासन

**डॉ. सटाले सिध्देश्वर नामदेव**
राज्यशास्त्र विभाग
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई

**प्रस्तावना :-**

कृषि विकास, औद्योगिक विकास आणि सामाजिक, धार्मिक सुधारणा या तीन प्रकल्पांमधुन लोक जागृत आणि त्यांचेद्वारा सर्वांगीण स्वातंत्र्याचे जागरण केले. माणसामाणसांमधील भेद कमी करणे आणि एकसंध समाजाची निर्मिती हा या प्रयत्नामागील मुख्य धागा होता. शाहू महाराजांनी विविध चळवळींच्या संदर्भात आपण पुढे कसे जाऊ? या शोध घेतला आणि पुढेच जाण्याची वाट चोखाळली. मागे त्यांनी पाहिलेच नाही. खरे तर, बहुसंख्य विचारवंताना प्रश्न करण्यामध्ये रस असतो. पण प्रश्नांपेक्षा त्यांचे प्रयोग हे अधिक बोलके (Instructive) असतात. प्रश्न अपेक्षित काय आहे हे सांगतात. प्रयोग प्रत्यक्ष सिध्दीची मायाच सादर करतात आपण मागे किंवा पुढे किती राहू-जाऊ याचा प्रत्यक्ष पाठ देतात. शाहू महाराजांनी असे प्रयोग केले. त्यामुळे महाराष्ट्रात जागोजागी सामाजिक समतेच्या आणि क्रांतीच्या पुरोगामी विचारांची शक्तिशाली केंद्रे निर्माण झाली. मक्तेदारीकडून सार्वजनिकतेकडे प्रवाहात जाणाऱ्या शिक्षणाच्या गंगेने महाराष्ट्र - देशाचा चेहरामोहरा बदलून टाकला. राजर्षी शाहू महाराजांचे प्रशासन विषयक विचारांमधील काही पैलू खालील प्रमाणे.

*** आदर्श प्रमुख प्रशासकांच्या पुढील गुण विशेषतः आहेत ज्या शाहू महाराजामध्ये दिसून येतात.**

**१. प्रभावी व्यक्तिमत्व :**

यशवंतराव घाटगे यांना १७ मार्च १८८४ रोजी राजघराण्यात व शाहू नावे संबोधण्यात आले. शाहू महाराजांनी शिक्षण पुर्ण करुन २ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली. शाहू महाराज उंच, धिप्पाड, शरीर प्रकृतीचे होते. तेजस्वी, भारदस्त व इतरावर छाप/प्रभाव टाकणारे त्यांचे व्यक्तीमत्व होते. शाहु महाराजांची उत्तम शरीर प्रकृती जणू निसर्गदत्त देणगीच होती. शाहू महाराज हे अत्यंत साधे राहत असत. ते स्वभावाने निकोप, सरळ मनाचे दिलदार व सत्यनिष्ठ असे होते.

**२. शिक्षित व बुध्दिमत्ता :-**

शाहु महाराजानी पाश्चिमात्य व भारतीय अशा दोन्ही प्रकारे शिक्षण पूर्ण केले होते. त्यांना ब्रिटिश शिक्षक फ्रेजर व भारतीय शिक्षक सबनीस यांनी वेगवेगळ्या प्रकारे संपूर्ण व परिपुर्ण असे शिक्षण दिले ज्यामध्ये राज्यकारभाराची तत्वे, विधीशास्त्र (कायदे), शासनाचे नियम, पोलीस पध्दत, दंडविधान व फौजदारी प्रक्रिया इत्यादीचा समावेश होतो.

**३. न्यायप्रियता व व्यावहारीक दृष्टी :-**

प्रशासकाजवळ व्यावहारीक दृष्टी व न्यायप्रियता असावी लागते जी शाहु महाराजामध्ये होती. कटकोळ हे गाव कर्नाटक सीमालगत असल्यामुळे येथील शाळेत शिक्षण हे मराठी की कानडी भाषेत घ्यावे हा वाद चालू होता. शाहु महाराजांनी असा निर्णय दिला की, मराठी ही राजभाषा असल्याने मराठी हे शिक्षणाचे माध्यम असावे परंतु व्यवहाराची भाषा म्हणून कानडी ही शिकवावी.



Scanned with CamScanner

४. समाजसेवेची भावना :-

भारतात होऊन गेलेल्या राजांचा इतिहास पाहिल्यास असे दिसून येते की, बहुतांश राजे हे विलासी, व्यसनी होते. त्यांना जनतेच्या सेवेची, जनतेची काहीच काळजी नव्हती परंतु शाहू महाराज हे आपल्या प्रजेची सतत काळजी घेणारे राजे होते. आपल्या प्रजेची जनतेची पर्यायाने संपूर्ण समाजाची शाहू महाराजांना काळजी होती हे त्यांनी काढलेल्या २ एप्रिल १८९४ च्या जाहीरनाम्यातून स्पष्ट होते. "आमचे प्रजानन सदा सुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हितासंबंधांची एक सारखी अभिवृध्दी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा उद्देश सफल होण्याच्या कामी आमचे जहागीरदार, आप्तजन, सरदार, मानकरी, इनामदार, कामदार, सर्व दर्जाचे शेट सावकार व इतर प्रजानन यांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्यांची आम्हास आवश्यकता आहे. आज आमच्या आमदानीस सुरुवात होणाऱ्या दिवशी आमचा राज्यकारभार दीर्घकाळापर्यंत टिकून तो सुखद व्हावा-म्हणून आम्ही त्या परात्पर जगचालकाच्या अनुग्रहासाठी प्रार्थना करतो."

५. परिस्थिती जाणणारा :-

प्रशासक राजाला आपल्या सभोवतालच्या परिस्थितीची संपूर्ण जाणीव असावी लागते. शाहू महाराज हे आपल्या संस्थानामधील सामाजिक, धार्मीक, आर्थिक, शैक्षणिक औद्योगिक व व्यापार विषयक, शेती विषयक अशा संपूर्ण परिस्थितीची जाणीव ठेवणारे प्रशासक होते. शाहू महाराज यांना यांची जाणीव होती की, जनतेच्या विकासामध्ये वाईट सामाजिक चालीरिती व अंधश्रध्दा यांचा मोठा अडसर आहे. म्हणूनच माणसाच्या प्रगती योग्य परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला. त्यासाठी लोकांना वास्तव परिस्थितीची जाणीव करुन दिली. त्यांची मानसिकता बदलवून स्वतःची पावले सावधपणे व धैर्याने व निर्धारपूर्ण टाकली. राज्याचा विकास करण्यासाठी सर्व समावेशकता आवश्यक असते म्हणूनच शासन व प्रशासनाचा पाया भक्कम करण्यासाठी फक्त एकाच जातीच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे ठेवण्याऐवजी इतर सर्व जातींना सुध्दा राज्यकारभारात-भाग घेता यावे अशा प्रकारचे धोरण शाहू महाराजांनी अवलंबिले.

शाहू छत्रपतींनी राज्याचा पूर्ण कारभार आपल्या हाती येताच प्रत्येक लहान सहान बाबतीत ते जातीचे लक्ष देऊ लागले. आपल्याआधी असणाऱ्या प्रशासन मंडळाच्या कारभारात शेकडो प्रकरणे धुळ खात पडून होती. लोकांचे त्यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुध्द दरबारात दाद मागण्यासाठी हजारो विनंत्या अर्ज पडून होते. प्रशासन मंडळ आणि राजनैतिक ब्रिटिश प्रतिनिधी लोकांना साध्यासाध्या कामासाठी हजारो हेलपाटे घालण्यास भाग पाडत होते. सामान्य जनाची कोणत्याच कामाची दाद लागत नव्हती. लाचलुचपत आणि दप्तर दिरंगाई हा नित्याचाच अनुभव होता. शाहू छत्रपतींनी कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता लोकांची अनिर्णीत प्रकरणे निकालात काढण्याचा निर्णय घेऊन त्याप्रमाणे ते प्रत्यक्ष कामास लागले.

शाहू छत्रपतींनी आपल्या प्रशासनाची कार्यक्षमता वाढावी म्हणून प्रशासनाच्या विविध पातळ्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न करीत होते. हुकूमांची अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी 'इन्सपेक्टर ऑफ ऑर्डर्स' हा खास अधिकारी त्यांनी नेमला होता. शाहू छत्रपती प्रत्यक्ष हजर असताना कामाच्या हुकूमाची लेखी नोंद करावी लागे. हा नियमभंग करणाऱ्या अधिकाऱ्यास १५ रु.दंड केला जात होता. परंतु काही अपवादात्मक प्रसंगी कोणत्याही अंमलदाराने हुजूरांचे समक्ष आज्ञा घेऊ नये असा शाहू छत्रपतींचा आदेश होता. कामात उशीर झाल्यास प्रत्येक दिवसाला १ रु. दंड आकारण्यात



Scanned with CamScanner

येत होता. कोणतेही काम इंग्रजी किंवा मराठी यापैकी एकाच भाषेत शेवटपर्यंत चालवावे असाही निर्बंध होता. केवळ रजा अर्ज पाठवून रजेवर जाता येणार नाही, तर त्या रजेला वरिष्ठांची मान्यता मिळाल्यावरच रजा भोगता येईल असाही कडक नियम होता. नोकरदारांनी कार्यालयात वेळेतच आले पाहिजे, बदली नको तर बढती नाही इत्यादी अनेक नियम निर्बंधामधून राजर्षी शाहू छत्रपतींनी आपले प्रशासन अधिक गतीमान तर केलेच परंतु त्याबरोबरच लाच खाऊ, भ्रष्टाचारी आणि मग्रूर नोकरशाहीच्या अजगरी विळख्यातून प्रशासनाची सुटका झाली.

शाहू छत्रपतींनी आपल्या कारकिर्दीच्या पहिल्या दोन दशकात अनेक लोककल्याणकारी निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी मोठ्या जिद्दीने केलेली आढळते. आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी पुढील काही योजना प्रत्यक्ष कार्यवाहीत आणल्या.

१. वेठबिगारीची जुलमी पध्दत बंद केली.

२. बाजारपेठेतील ग्राहकांची फसवणूक आणि व्यापाऱ्यांचा भ्रष्टाचार थांबविला.

३. राज्याच्या मालकीच्या चराऊ कुरणात गोरगरीबांच्या जनावरांना चरण्याची मुभा देण्यात आली.

४. जहागिरदार- इनामदारांनी लवकर कर्ज मुक्त व्हावे म्हणून त्यांना कमी व्याजाने कर्ज पुरवठा करण्यात आला.

५. गोरगरीब लोकांच्या आजारी जनावरांना औषध, चारापाणी याची खास व्यवस्था केली.

६. काही जंगल अधिकाऱ्यांना चहा-कॉफिच्या लागवडीचा विशेष अभ्यास करण्यासाठी पन्हाळ्याच्या डोंगरावर चहा तर भुदरगड पेठ्यात कॉफीचे पिक घेण्याचा यशस्वी प्रयोग राबविण्यात आला.

७. राज्यातील उद्योगाची पूर्ण सर्वेक्षण पहाणी करण्यात आली.

८. कोल्हापूर रेल्वे स्टेशन जवळ 'शाहपूरी' ही नविन वसाहत निर्माण केली.

९. गुळाची नवीन बाजारपेठ सुरु केली.

१०. राज्यातील शैक्षणिक सुधारणांना वेग यावा म्हणून खास समिती नेमण्यात आली.

११. राजाराम कॉलेजमध्ये पदवीपर्यंत पूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे अशी व्यवस्था केली.

१२. डोंगराळ आणि जंगल भागातील आदिवासींना राज्याच्या सेवेत नोकऱ्या देण्याची व्यवस्था केली.

**सारांश :**

शाहू महाराजांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक शेती, उद्योग, व्यापार या सर्वच क्षेत्रात त्यांनी अमूलाग्र बदल घडवून प्रशासन व्यवस्थेची घडी व्यवस्थीत बसविली. परिणामी प्रशासनातच नव्हे तर न्यायीक पातळीवर देखील सुधारणा करण्यात आल्या. समता आणि बंधुता हे प्रशासनाचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये त्यांनी मानले. व या तत्वाचा पाठपुरावा क्रियाशीलतेने महाराजांनी आयुष्यभर केला.

❑ ❑ ❑



Scanned with CamScanner